जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAY 2025
सकाळ

# विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्राची प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. बी.ए., बी.कॉम.,एम.ए.(मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास), एम.कॉम., एम.एस्सी.(गणित), एम.बी.ए., ऑनलाईन एम.बी.ए.,एम.कॉम. आणि एम.एस्सी (गणित) प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० जून आहे. जे विद्यार्थी अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत, ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे, तसेच शासकीय व निमशासकीय अथवा खासगी कर्मचारी, सेवक अशा इच्छुकांनी दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एकूण ८६ अभ्यासकेंद्रांत प्रवेशाची संधी मिळणार आहे. (www.unishivaji.ac.in) या संकेतस्थळावर (Distance Education) या लिंकवर प्रवेशाची माहिती उपलब्ध आहे. जे विद्यार्थी नियमित महाविद्यालयात प्रवेशित झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीसाठी प्रवेश घेता येणार आहे. अधिक माहितीसाठी विद्यापीठातील मुख्य कार्यालयाशी अथवा महाविद्यालयातील अभ्यासकेंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रभारी संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 MAY 2025
पुढारी

# 'अर्थ साक्षरता, फसव्या योजनेपासून सावधानता' विषयावर डॉ. ककडे यांचे उद्या मार्गदर्शन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात कार्यरत अर्थतज्ज्ञ, अर्थशास्त्र माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. विजय ककडे हे अर्थ साक्षरतेची माहिती, फसव्या योजनेपासून सावधानता, मोबाईलमार्फत होणारी फसवणूक व गुंतवणुकीचा योग्य पर्याय याबद्दल माहिती सांगणार आहेत. गुरुवार, दि. २९ मे रोजी सायंकाळी ६.४५ वाजता एस. टी. कॉलनी, सायबर चौकाजवळ, राजारामपुरी येथे हा कार्यक्रम होणार आहे. ज्येष्ठ नागरिक निवृत्तीचा उदरनिर्वाह योग्य प्रकारे चालावा म्हणून आयुष्यभराची पुंजी योग्य ठिकाणी ठेवण्याचा प्रयत्न करतात. परंतु अलीकडे मोबाईल फसवणुकीचे अनेक प्रकार समोर येत असून त्यास अनेक ज्येष्ठ नागरिक बळी पडत आहेत. याबद्दल कार्यक्रमात ते मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.